# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

३४१ - २३ दिनांक : - ०३/१०/२०२३

## घरफोडी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास ४८ तासांत अटक करुन त्यांच्याकडुन ११ गुन्हे उघडकीस आणुन लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २०/०९/२०२३ रोजी ७.४५ वा. ते ९.२५ वाजताचे दरम्यान रुम नं ००४, बी विंग कोहिनुर बिल्डींग जामा मस्जीद जवळ, पेल्हार गाव, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी श्री. जैद नजीर शेरशिया वय- २३ वर्ष धंदा - नोकरी रा. रुम नं ००४, बी विंग कोहिनुर बिल्डींग जामा मस्जीद जवळ, पेल्हार गाव, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर यांच्या बंद घराच्या दरवाज्याची कडी कोयंडा कोणीतरी अज्ञात इसमाने कशाच्यातरी सहाय्याने तोडुन घरफोडी चोरी करुन फिर्यादी यांचे घरातुन १०,१५,०००/ रुपये रोख रक्कम चोरी करुन चोरुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ा ८७१/२०२३ भा.द.वि. ३८०, ४५४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे, यांनी सदर गुन्हयाचा तपास गुन्हेप्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. सोपान पाटील यांच्याकडे देऊन गुन्हेप्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांचे वेगवेगळे ०५ पथके तयार करुन गुन्हयातील अज्ञात आरोपीत यांचा शोध घेऊन गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते.

सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अमंलदार यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळाच्या परिसरातील सुमारे ६० वेगवेगळया ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन आरोपीत यास निष्पन्न करुन सदर आरोपीत यांच्या बाबत गुप्त बातमीदार यांच्याकडुन माहिती प्राप्त केली असता आरोपीत हा भिवंडी येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने आरोपीत यांचा भिवंडी, अंबाडी पारोळ, नालासोपारा फाटा, शानबार हॉटेल, धानिवबाग नालासोपारा पुर्व असा पाठलाग करुन आरोपीत चंद्रकांन्त रवि लोखंडे ऊर्फ चंदु, वय- २६ वर्ष, रा. जानकीपाडा, आंबेडकर नगर, मराठी शाळे जवळ, वालीव, वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर, यास शानबार हॉटेलच्या जवळ, धानिवबाग नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथुन ताब्यात घेऊन त्यांच्याकडे सदर गुन्हयाचे अनुषंघाने तपास केला असता त्याचा गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीत यांच्याकडे कौशल्यपुर्वक तपास करुन त्यांने सदर गुन्हयात चोरी केलेल्या रोख रक्कमेपैकी ५,१२,७००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयामध्ये तपास अधिकारी यांनी अटक आरोपीत यांच्याकडे अधिक तपास केला असता आरोपीत यांच्याकडुन पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील एकुण ०८, वालीव पोलीस ठाणे हद्दीतील ०२, मांडवी पोलीस ठाणे हद्दीतील ०१ असे एकुण ११ घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

### उघडकीस आलेले गुन्हे

| | |
|---|---|
| ०१) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ८७१/२०२३ भादविस कलम ३८०,४५७ प्रमाणे. |
| ०२) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ७७२/२०२३ भादविस कलम ३८०,४५७ प्रमाणे. |

| | |
|---|---|
| ०३) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ८७२/२०२३ भादविस कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| ०४) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ३८६/२०२३ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०५) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ३१३/२०२३ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०६) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ४२२/२०२३ भादविस कलम ४५७,४५४,३८० प्रमाणे. |
| ०७) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ४८९/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे. |
| ०८) | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ५७५/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |
| ०९) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७३०/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |
| १०) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७४७/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |
| ११) | मांडवी पोलीस ठाणे गु.र.क्र. ८०/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |

अटक आरोपीत यांचेकडुन उघडकीस आलेल्या चोरी/घरफोडीच्या एकुण ११ गुन्हयामध्ये रोख रक्कम, सोने चांदीचे दागिने, व मोबाईल असे एकुण ८,९९,५५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन त्याच्या विरुध्द वालीव पोलीस ठाणे व तुळींज पोलीस ठाणे येथे यापुर्वी खालील प्रमाणे एकुण १० गुन्हे दाखल आहेत.**

| | |
|---|---|
| ०१) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ६३४/२०१८ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०२) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ६२५/२०१८ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०३) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ६४४/२०१८ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०४) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ६७५/२०१८ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०५) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ६८३/२०१८ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ०६) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ९२९/२०१८ भादविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे. |
| ०७) | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ८५१/२०२२ भादविस कलम ३८०,४५४,५११ प्रमाणे. |
| ०८) | तुळींज पोलीस ठाणे गु.र.क्र. १०८३/२०२० भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. |
| ०९) | तुळींज पोलीस ठाणे गु.र.क्र. १११९/२०२० भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. |
| १०) | तुळींज पोलीस ठाणे गु.र.क्र. ४९०/२०२१ भादविस कलम ४५४,३८० प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, मिभाववि पोलीस आयुक्तालय, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो, मिभाववि पोलीस आयुक्तालय, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे श्री. सोपान पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, पोहवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं. रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, दिपक शेळके, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे पोहवा. नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख, नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३, मिभाववि पोलीस आयुक्तालय यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.